स्वयं अर्थसहाय्यित शाळा

जा.क्र.जिपनां/शिव(मा)/मा-4/ /2026 /4151
कार्यालय शिक्षण विभाग (मा.)
जिल्हा परिषद, नांदेड
दिनांक : 25 SEP 2026

प्रति,
मा.शिक्षण उपसंचालक,
लातूर विभाग, लातूर.

विषय : शांतिनीकेतन पब्लीक स्कूल व ज्युनिअर कॉलेज मालेगाव ता. अर्धापूर जि. नांदेड या शाळेस सी.बी.एस.ई. मंडळ संलग्नतेसाठी नाहरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव स्वीकारणे बाबत.

संदर्भ : 1) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा शासन निर्णय क्र.एस.एफ.एस.1016/प्र.क्र.69/एस.एम.-2 दि.17.06.2016
2) शासन निर्णय क्र.नाहप्र 2009/(663/09) माशि-1 दि.20.06.2012
3) सचिव, जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, नविन नांदेड ता.जि. नांदेड यांचे पत्र दि.13.07.2026

महोदय,

वरील विषयान्वये सादर करण्यात येते की, संदर्भ क्र.1 अन्वये जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ सिडको नविन नांदेड ता. जि. नांदेड संचलित शांतीनिकेतन पब्लिक स्कुल मालेगाव ता. अर्धापूर जि. नांदेड या शाळेस इ.1 ली ते 12 वी पर्यंत शासनाकडून स्वंयअर्थसहाय्यीत तत्त्वावर मान्यता प्रदान करण्यात आली आहे. संदर्भ क्र.3 अन्वये सदरील शाळेत इ.1 ली ते 12 वी पर्यंत वर्ग सुरू करण्यात आलें असून संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र इमारत, शिक्षक, फर्निचर, शैक्षणिक साहित्य, क्रीडा साहित्य व सर्व आवश्यक भौतिक सुविधा उपलब्ध करून दिल्या असून या शाळेत सी.बी.एस.ई. संलग्न अभ्यासक्रम सुरू करावयाचा असून सी.बी.एस.ई. मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी शासनाची नाहरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी संदर्भ क्र.3 अन्वये सूचित केल्यानुसार विहीत नमुण्यात प्रस्ताव या कार्यालयास सादर केला आहे.

त्यानुसार सी.बी.एस.ई. मंडळाकडे प्रस्ताव सादर करण्यासाठी शासनाची नाहरकत प्रमाणपत्र मिळणेसाठीचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी आपल्या कार्यालयाकडे सादर करण्यात येत आहे.

कृपया स्वीकार व्हावा ही विनंती.

सोबत : प्रस्ताव

आपला विश्वासू

(माधव सलगर)
शिक्षणाधिकारी (मा.)
जिल्हा परिषद, नांदेड

28/9/26
आवक रिपोर्ट
विभागीय शिक्षण उपसंचालक
लातूर

प्रत,
1) सचिव, जवाहरलाल शिक्षण प्रसारक मंडळ सिडको, नविन नांदेड ता. जि. नांदेड यांना माहितीस्तव.

(माधव सलगर)
शिक्षणाधिकारी (मा.)
जिल्हा परिषद, नांदेड

O/C